# मी

जातिः लीलारती

मेघांची पटले भेगुनि गगनोदरी
संचार करी तो गरूड नसे मी परी-
बहरली जिथे हिरवळीत कोमल फुले
मी फुलपाखरू झुले तिथे चिमुकले

लखलखून उजळी घन तिमिराला अशी
मी विद्युल्लतिका नसे कुणी उर्वशी
ढग एक परी जो दिसतो गगनांगणी
चमकते तयातुन इवली मी चान्दणी

उद्दाम उधळिते सुगंध श्वासांतुनी
मी गुलाबकलिका नाही मी मानिनी
लाजुनियस बसते लपून पर्णांतरी
मी साधीभोळी तुळशीची मंजरी

दुंदुभिपरी जे आसमंत घुमवित
ते गभीर नाही मी सागरगर्जित
नाचतो परी जो कड्यांतुनी निर्झर
मी कलरव त्याचा अस्फुट अन् मर्मर

द्वेषाचे नाही भयकर मी तांडव
क्रोधाची नाही ज्वाला मी अभिनव
जे फुले अकारण चिमण्या गालांवरी-
त्या हास्यामधली केवळ मी माधुरी

शान्ता शेळके
वर्षा

शान्ता शेळके यांच्या पहिल्या कवितासंग्रहातली ही अगदी पहिलीच कविता. त्यांच्या सुरुवातीच्या बऱ्याचशा कविता अगदी साध्या सरळ बाळबोध वाटतात. त्या तशाच असणार असे सुचविणारी ही कविता.

आपल्याला कुणालाही काहीही शिकवायचे नाही, प्रतीके, उपमा, उत्प्रेक्षांची बरसात करून वाचकाला बुचकळयात टाकायचे नाही किंवा कुठलेतरी गूढगुंजन करून रसिकांना टांगून ठेवायचे नाही असा या कवितांचा भाव आढळतो.

त्याचप्रमाणे ह्या कवितांमध्ये क्रांतीकारक अथवा विध्वंसक भावही नाहीत. त्यामुळे आग, ज्वाला, विस्फोट इत्यादी मंडळी त्यांच्या कवितांपासून दूरच राहिले आहेत.
आपल्या कवितेत असामान्य काही नाही आणि ती सामान्यांसाठीच लिहिलेली आहे असेच त्यांना सुचवायचे असावे.

आपल्या कवितेचे आत्मपरीक्षण इतक्या नेमक्या शब्दांमध्ये खूपच कमी वेळा वाचायला मिळते. त्या नुसत्याच मर्यादा सांगत नाहीत तर तितक्याच सहजपणे गुणविशेषही सांगतात.

आपल्या पहिल्याच काव्यसंग्रहाची पहिलीच कविता अशी आत्मपरीक्षणपर असावी असे शान्ताबाईंना का वाटले हे सांगणे कठीण आहे. याकरता लागणारे धैर्य भल्या-भल्या मंडळीकडे नसते.
मी उंच आकाशात संचार करणारा गरूड नाही तर फुलांजवळ (जमिनीलगत) मोकळेपणी वावरणारे फुलपाखरू आहोत, निमिषार्धात चमकून जाणारी वीज नाही तर एखाद्या ढगाआडून शान्तपणे लुकलुकणारी चांदणी आहोत. ह्या गोष्टी मला खूपच आवडल्या.

ही कविता वाचतांना गुलाबाचा सुगंध आणि तुळशीची गंधरहित मंजरी यातील विरोधाभास एकदम धाडकन जाणवला. तुळशीच्या मंजरीकडे आजवर मी अशा विचाराने कधीच बघितले नव्हते.

तशीच ती गडयाकपारीतून कानावर पडणारी झऱ्याची गाज. लक्ष दिले नाही तर जाणवतही नाही पण स्तब्ध शान्ततेच्या क्षणी अतिशय आश्वासक वाटणारी. समुद्रकिनाऱ्यावर बसलो असतांना तो लाटांचा गंभीर आवाज आपल्या कानांवर सतत आदळत असतो आणि आपल्या ताकदीची सतत जाणीव करून देतो.
लहान बाळाच्या गालावरील निर्व्याज हसू, द्वेष किंवा क्रोधाच्या प्रलयाला सहज दूर लोटू शकेल याची मला खात्री आहे. कुठल्याही कारणाशिवाय इतक्या निर्मळपणे हसण्याची किमया फक्त त्या निरागस लहान मुलांमध्येच असते.

ही कविता लिहीली त्याला आता साठ वर्षे होऊन गेली आहेत. आजचा जमानाच वेगळा आहे. आज काळ आहे (वेळप्रसंगी उसना प्रकाश घेऊनसुद्धा) क्षणभरच का असेना पण चमकून लुप्त होणाऱ्या विजेचा. मी कसा असामान्य आहे याचा ढोल बडविणे हा निसर्गधर्म वाटायला लागला आहे.
अशा वेळी अशा ज्येष्ठ आणि श्रेष्ठ कवयित्रीने माझी कविता सामान्य आहे असे कुठलाही अभिनिवेष न बाळगता सांगितल्याचे मला अप्रूप वाटले.
त्यामुळेच माझ्यासारख्या सामान्य माणसाला ही कविता आपलीशी वाटली यात नवल नाही.

**मन्दार**